सकाळ
कोल्हापूर, शुक्रवार,
२६ मार्च २०२१



पेरणोली (ता. आजरा) : येथील प्राथमिक शाळेत खेळाचे गणवेश वाटप करताना एम. एल. चौगुले, उषाताई जाधव, गणपती नाईक आदी.

# 'रवळनाथ'ने सामाजिक बांधिलकी जपली : चौगुले

आजरा, ता. २५ : सहकारी संस्थांनी नफा मिळवून संस्थेच्या प्रगतीचा आलेख उंचवावा, पण त्याचबरोबर सामाजिक बांधिलकी जोपासूनही समाज उपयोगी काम करावीत. रवळनाथ हौसिंग सोसायटी सामाजिक बांधिलकी ठेवूनच कार्यरत असल्याचे प्रतिपादन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी केले.

पेरणोली (ता. आजरा) येथे श्री. रवळनाथ को- ऑप हौसिंग फायनान्स सोसायटी (मल्टिस्टेट) या संस्थेच्या माध्यमातून मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना खेळाचे गणवेश वाटप केले. या वेळी चौगुले बोलत होते. सरपंच उषाताई जाधव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

मुख्याध्यापिका स्नेहा क्षीरसागर यांनी स्वागत केले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कृष्णा सावंत यांनी प्रास्ताविक केले. चौगुले म्हणाले, ''खेळामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी प्रावीण्य मिळवावे. त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी संस्थेकडून गणवेश वाटप करण्यात आले. इथून पुढे होतकरू, हुशार विद्यार्थ्यांसाठी संस्थेकडून मदत कायम राहील.'' उद्योजक गणपती नाईक म्हणाले, ''जीवनात शिक्षण हे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाची कास सोडू नये.'' उपसरपंच उत्तम देसाई, आजरा महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. राजीव टोपले, नुरजहाँ सोलापुरे, रणजित कालेकर यांची भाषणे झाली. चौगुले व मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना ३० गणवेशांचे वाटप झाले. रवळनाथचे उपाध्यक्ष प्रा. वासुदेव मायदेव, आजरा शाखाध्यक्ष विनायक आजगेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय मायदेव, प्रकाश देऊसकर, विष्णू पोवार, विना रेळेकर, उदय कोडक, उत्तम दळवी, जयश्री वरेकर, कविता मगदूम नाईक उपस्थित होते. अनुष्का गोवेकर यांनी सूत्रसंचालन केले. सुप्रिया पाटील यांनी आभार मानले.


जिल्हा परिषद कोल्हापूर
केंद्रशाळा विद्या मंदिर पेरणोली

तरुण भारत शनिवार, २७ मार्च २०२१

# सामाजिक बांधिलकीसाठी रवळनाथ कटिबद्ध

## एम. एल. चौगुले : पेरणोलीत रवळनाथ हौसिंग सोसायटीकडून खेळाच्या गणवेशाचे वाटप

प्रतिनिधी
आजरा

सहकारी संस्थांनी व्यावसायिक दृष्टीकोन ठेवून केवळ नफा मिळविण्याचा उद्देश न ठेवता सामाजिक बांधिलकी जोपासावी. रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीचा उद्देशच सामाजिक बांधिलकी असल्याने त्यासाठी रवळनाथ नेहमीच कटिबद्ध असल्याचे मत रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीचे अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी व्यक्त केले.

पेरणोली येथील विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांना रवळनाथ सोसायटीच्यावतीने खेळाच्या गणवेशाचे वाटप करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी पेरणोली सरपंच उषा जाधव होत्या. स्वागत मुख्याध्यापिका स्नेहा क्षीरसागर यांनी केले. प्रास्ताविक शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कृष्णा सावंत यांनी केले. यावेळी चौगुले म्हणाले, खेळामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळवावे. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी संस्थेकडून गणवेश वाटप करण्यात आल्याचे सांगितले. गरीब विद्यार्थ्यांचा शैक्षणिक सोबत खेळातही विकास होणे महत्वाचे असल्याचे सांगितले. उद्योजक गणपती नाईक यांनी शिक्षण हेच सर्वश्रेष्ठ आहे. त्यामुळे शिक्षणात तडजोड न करता ध्येयपूर्तीसाठी विद्यार्थ्यांनी वाटचाल करावी असे सांगितले.



**पेरणोली : येथील विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करताना एम. एल. चौगुले. यावेळी उपस्थित सरपंच उषा जाधव, कृष्णा सावंत, गणपती नाईक, राजीव टोपले, उत्तम देसाई, दत्तात्रय मायदेव.**

यानंतर पेरणोली विद्यामंदिर येथील ३० विद्यार्थ्यांना चौगुले यांच्या हस्ते गणवेश वाटप करण्यात आले. यावेळी उपसरपंच उत्तम देसाई, उपप्राचार्य राजीव टोपले, नुरजहाँ सोलापूरे, रणजित कालेकर यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला रवळनाथ संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, आजरा शाखा चेअरमन प्रा. विनायक आजगेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, शाखाधिकारी उत्तम दळवी, विष्णू पोवार, विना रेळेकर, ऊलय कोडक, जयश्री वरेकर, कविता नाईक उपस्थित होते. अनुष्का गोवेकर यांनी सूत्रसंचालन केले तर सुप्रिया पाटील यांनी आभार मानले.

लोकमत

# समाजकार्यात 'रवळनाथ' अग्रेसर : चौगुले

## पेरणोलीतील शाळेत रवळनाथ सोसायटीकडून गणवेश वाटप



पेरणोली (ता. आजरा) येथील प्राथमिक शाळेत खेळाचे गणवेश वाटप करतान एम. एल. चौगुले. शेजारी सरपंच उषा जाधव, कृष्णा सावंत, गणपती नाईक, राजीव टोपले, उत्तम देसाई, दत्तात्रय मायदेव, प्रकाश देऊसकर उपस्थित होते.

**पेरणोली :** सहकारी संस्थांनी व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून केवळ नफा मिळवण्याचा उद्देश न ठेवता सामाजिक बांधिलकी जोपासावी. रवळनाथ हौसिंग सोसायटीचा उद्देश सामाजिक बांधिलकी असल्याने त्यासाठी 'रवळनाथ' नेहमीच कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी केले.

पेरणोली (ता. आजरा) येथील केंद्रीय मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांना रवळनाथतर्फे खेळाचे गणवेश वाटप केले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सरपंच उषा जाधव होत्या.यावेळी उद्योजक गणपती नाईक उपसरपंच उत्तम देसाई, उपप्राचार्य प्रा. राजीव टोपले, नूरजहाँ सोलापुरे, रणजित कालेकर यांनी मनोगत व्यक्त केले.

उपाध्यक्ष प्रा. वासुदेव मायदेव, आजरा शाखाध्यक्ष विना आजगेकर, दत्तात्रय मायदेव, वि पोवार, वीणा रेळेकर, ऊलय को उत्तम दळवी, जयश्री वरेकर, क नाईक आदी उपस्थित होते.